# प्रसिध्दी पत्रक

**आरोपी लोकसेवक राजेंद्र जयराम रावते, वय ३५ वर्षे, ग्रामसेवक, माळीवाडगाव यांनी ५०००/- रु लाच स्विकारल्या नंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळयात**

| | | |
|---|---|---|
| आरोपी लोकसेवकाचे नांव हुद्दा व पत्ता | :- | आरोपी लोकसेवक राजेंद्र जयराम रावते, वय ३५ वर्षे, ग्रामसेवक, माळीवाडगाव, रा. शिल्लेगाव, ता. गंगापुर, जि. औरंगाबाद |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे दिनांक | :- | पोलीस ठाणे शिल्लेगाव, ता. गंगापुर, औरंगाबाद ग्रामीण येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |
| तपासी अधिकारी | :- | श्रीमती रेशमा सौदागर, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद |
| लाच रक्कम | :- | ५०००/- रुपये लाचेची मागणी करुन स्विकारले |
| लाच मागण्याचा हेतु | :- | रमाई आवास योजने अंतर्गत घरकुल मंजुरीसाठी तक्रारदार यांचे नाव पंचायत समिती, गंगापुर येथे पाठविल्याचे बक्षीस म्हणून ५०००/- रु लाचेची मागणी करून , ५०००/- रु लाचेची रक्कम स्विकारली. |
| मागणी व स्विकृती ठिकाण | :- | लासुर स्टेशन बसस्टँड परिसर, लासुर स्टेशन, ता. गंगापुर, जि. औरंगाबाद. |

**तक्रारीचे थोडक्यात स्वरुप :-** यातील तक्रारदार यांचे रमाई आवास योजने अंतर्गत घरकुल मंजुरीसाठी तक्रारदार यांचे नाव पंचायत समिती, गंगापुर येथे पाठविल्याचे बक्षीस म्हणून राजेंद्र रावते, ग्रामसेवक- माळीवाडगाव यांनी तक्रारदार यांच्याकडे ५०००/- रु लाचेची मागणी केली होती. तक्रारदार यांना राजेंद्र रावते, ग्रामसेवक- माळीवाडगाव यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,औरंगाबाद येथे तक्रार दिली.

सदर तक्रारीचे अनुषंगाने राजेंद्र रावते, ग्रामसेवक-माळीवाडगाव यांची लाचेच्या मागणीची शहानिशा केली असता, त्यांनी तक्रारदार यांच्याकडे ५०००/- रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,औरंगाबाद तर्फे आज दिनांक १०/०२/२०२० रोजी सापळा आयोजीत केला असता, राजेंद्र जयराम रावते, ग्रामसेवक-माळीवाडगाव, यांनी तक्रारदार यांच्याकडुन ५०००/- रुपये लाचेची रक्कम वर नमुद ठिकाणी स्विकारल्यानंतर त्यांना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांच्याविरुद्ध पोलीस ठाणे शिल्लेगाव, औरंगाबाद ग्रामीण येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कारवाई ही पोलीस अधिक्षक मा. श्री. अरविंद चावरीया, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद, अपर पोलीस अधिक्षक मा. डॉ. अनिता जमादार, पोलीस उपअधीक्षक श्री. बी. व्ही. गावडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्रीमती रेशमा सौदागर यांनी केली आहे. त्यांना पोना रवींद्र अंबेकर, गोपाल बरंडवाल, पो.शि. किशोर म्हस्के, चालक पोशि शिंदे यांनी मदत केली आहे.

**तक्रारदार यांच्याप्रमाणे नागरीकांनी भ्रष्टाचारासंबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन मा. पोलीस अधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद यांनी केले आहे.**

**फोन क्रं. ०२४०-२३४४०५०, टोल फ्रि क्रं. १०६४**

**EMail ID :-**1) sp1acbaurangabad@gmail.com, 2) spacbaurangabad@mahapolice.gov.in

१०/०२/२०२०

**(बी.व्ही.गावडे)**
**पोलीस उप अधीक्षक**
**लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,**
**औरंगाबाद.**